पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

सभावृत्तांत

कार्यपत्रिका क्रमांक ६

दिनांक: ११/०९/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

----------------------------------------------------------------

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१४ ची मासिक सभा गुरुवार दिनांक ११/०९/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील ' राजमाता जिजाऊ सभागृह ' येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा. सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे - सभापती
२. मा.बाबर शारदा प्रकाश
३. मा. भारती फरांदे
४. मा. जावेद रमजान शेख
५. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
६. मा. राजू मिसाळ
७. मा. नेटके सुमन राजेंद्र
८. मा. तरस बाळासाहेब जयवंत
९. मा. भोंडवे संगिता राजेंद्र
१०. मा. प्रसाद शेट्टी
११. मा. सौ.काळभोर वैशाली जालिंदर

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर-क्षेत्रीय अधिकारी, श्री. शेख फारुख, - कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.मोहन करमरकर- उपअभियंता पाणीपुरवठा, श्रीम. लता बाबर- उपअभियंता विद्युत, श्री.संजय भोसले, श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे, श्री.वैभव पुसाळकर - उपअभियंता स्थापत्य, श्री. प्रदिप पुजारी - उपअभियंता झो.नि.पु., श्री.के.डी.दरवडे - सहा.आरोग्याधिकारी, श्री.पांडूरंग जाधव-लेखाधिकारी, श्री.कुलकर्णी ए.ए.– कनिष्ठ अभियंता जलनि:सारण, श्री.डी.एस.सासवडकर – मुख्य आरोग्य निरीक्षक व श्री.एन.जी.गायकवाड-आरोग्य निरीक्षक इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

**मा. भोंडवे संगिता राजेंद्र:** दिनांक १३/८/२०१४ रोजी झालेल्या प्रभाग समिती सभेतील ठराव क्रमांक २९ विषय क्रमांक १ मध्ये "या प्रमाणे घोषित करणेस मान्यता देणेकामी सदरचा विषय मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे" सदरचा मजकूर वगळण्यात येऊन त्या ऐवजी **" या प्रमाणे घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे"** असे नमूद करण्याची दुरुस्ती करण्यात यावी.

अ) ठराव क्रमांक २९ मध्ये " या प्रमाणे घोषित करणेस मान्यता देणेकामी सदरचा विषय मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे" हा मजकूर वगळण्यात येऊन ऐवजी **" या प्रमाणे घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे"** अशी दुरुस्ती करण्यात आलेचे व दुरुस्तीसह दिनांक १३/०८/२०१४ रोजी घेणेत आलेल्या माहे ऑगस्ट चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र. ५) कायम करणेत आलेचे मा. सभापतींनी प्रकट केले.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

| | |
|---|---|
| विषय क्र. १ | मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक अक्षे/वि/५/कावि/३१३/२०१४<br>दि.१०/९/१४ - तरतूद वर्ग करणेबाबत. |
| विषय क्र. २ | मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक अक्षेका/वि/१/कावि/९९२/१४<br>दि.१०/९/१४ - तरतुद वर्ग करणेबाबत |
| विषय क्र. ३ | मा. बाबर शारदा प्रकाश यांचा प्रस्ताव<br>नागरीकांसाठी महत्वाचे ठिकाणी दिशादर्शक व फोन नंबरचे फलक लावणेबाबत. |
| विषय क्र. ४ | मा. राजू मिसाळ यांचा प्रस्ताव<br>रस्त्यावरील उजेडास आडथळा करणा-या झाडाच्या फांद्या छाटणेबाबत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३४ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : ११/०९/२०१४ | विभाग | : विद्युत/ लेखा |
| सुचक | : मा. जावेद शेख | अनुमोदक | : मा. प्रतिभा भालेराव |

संदर्भ: मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक
अक्षे/वि/५/कावि/३१३/२०१४ दि.१०/९/२०१४

अ क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभागाकडील इमारत, शाळा, शॉपिंग सेंटर या लेखाशिर्षावरील र.रु.१५,००,०००/- (पंधरा लाख) पैकी र.रु.१,९६,०००/- (एक लाख शहाण्णव हजार) सार्वजनिक सुरक्षितता या लेखाशिर्षावर तसेच महसुली खर्च देखभाल दुरुस्तीची कामे या लेखाशिर्षावरील र.रु.६६,९०,०००/- (सहासष्ठ लाख नव्वद लाख पैकी र.रु.५,५०,०००/- (पाच लाख पन्नास हजार) देखभाल दुरुस्तीची कामे या लेखाशिर्षावर (सोबतचे तक्त्याप्रमाणे) वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३५ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : ११/०९/२०१४ | विभाग | : विद्युत / लेखा |
| सुचक | : मा. प्रशांत शेट्टी | अनुमोदक | : मा. भारती फरांदे |

संदर्भ: मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक अक्षेका/वि/१/कावि/९९२/२०१४ दि.१०/९/२०१४

अ क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभागाकडील सन २०१४-१५ चे महसूली अंदाजपत्रकामध्ये वीजबीले या लेखाशिर्षावर र.रु.७२,००,०००/- (बहात्तर लाख) तरतूद केली असून माहे सप्टेंबर २०१४ अखेर १२,००,०००/- (बारा लाख) इतका खर्च झालेला असून पुढील संभाव्य खर्च र.रु.१६,००,०००/- (सोळा लाख) अपेक्षित आहे. सदर लेखाशिर्षातून (ररु.१२,००,०००/- + र.रु.१६,००,०००/-) असा एकूणर.रु. २८,००,०००/- (अठ्ठावीस लाख) खर्च वजा जाता उर्वरीत र.रु. ४४,००,०००/- (चव्वेचाळीस लाख) मधून “नवीन वीज मिटर” या लेखाशिर्षावर र.रु.५०,०००/- (पन्नास हजार) वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३६ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : ११/०९/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. बाबर शारदा प्रकाश | अनुमोदक | : मा. भोंडवे संगिता राजेंद्र |

संदर्भ: मा. बाबर शारदा प्रकाश यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक ८ विद्यानगर मध्ये महत्वाचे ठिकाणी सोबतचे यादीप्रमाणे नागरीकांसाठी दिशादर्शक व फोन नंबरचे फलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली

सूचक : मा.राजू मिसाळ                                        मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

दिनांक १०/०९/२०१४ रोजी संध्याकाळी आकुर्डी मधील हनुमान चौकामध्ये गणपती मंदिराजवळ श्री.निलेश पावसकर वय ४० वर्षे, रा. सिध्दीविनायक सोसायटी सेक्टर २७ अ, या नागरीकावर अज्ञात व्यक्तींनी गोळी झाडली. सदरचे घटनेचा निषेध करुन तसेच उद्यान विभागाचे विषयाबाबत चर्चा करणेकामी उद्यान विभागाचे कर्मचारी सभेस हजर नसलेने आजची प्रभाग समितीची सभा दिनांक १५/९/२०१४ रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत तहकुब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

मा.सभापती: सदरची सभा दिनांक १५/९/२०१४ रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

सही/-
(सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे)
सभापती
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

सभावृत्तांत

कार्यपत्रिका क्रमांक ६

(दिनांक ११/९/२०१४ ची तहकुब सभा)

दिनांक: १५/०९/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१४ ची गुरुवार दिनांक ११/०९/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता तहकुब करणेत आलेली मासिक सभा सोमवार दिनांक १५/०९/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील ' राजमाता जिजाऊ सभागृह ' येथे घेण्यात आली. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१) मा. सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे - सभापती
२) मा.आर.एस.कुमार
३) मा. भोंडवे संगिता राजेंद्र
४) मा. प्रसाद शेट्टी

याशिवाय श्री. दिलीप गावडे -क्षेत्रीय अधिकारी, श्री. शेख फारुख, - कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.लियाकत पिरजादे – कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.मोहन करमरकर, श्रीम. झेड.मोमीन -उपअभियंता पाणीपुरवठा, श्रीम. लता बाबर- उपअभियंता विद्युत, श्री.पांडूरंग जाधव-लेखाधिकारी, श्री.शितोळे एस.के- कनिष्ठअभियंता झो.नि.पु., श्री.कुलकर्णी ए.ए.– कनिष्ठ अभियंता जलनि:सारण, श्री.डी.एस.सासवडकर, श्री.डी.जे.शिर्के – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.पी.एम.गायकवाड-उद्यान अधिक्षक, श्री.नंदलाल भाट - मुख्य आरोग्य निरीक्षक पशु वैद्यकीय विभाग, श्री.कुंभार पी.एल. श्री.निकाळजे आर.बी. उद्यान पर्यवेक्षक इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ३७ | विषय क्रमांक | : ४ |
| दिनांक | : १५/०९/२०१४ | विभाग | : उद्यान/ विद्युत |
| सुचक | : मा. भोंडवे संगिता राजेंद्र | अनुमोदक | : मा.आर.एस. कुमार |

संदर्भ: मा. राजू मिसाळ यांचा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरात रत्यावरील झाडांच्या फांद्यामुळे पथदिव्यांना अडथळा येवून रस्त्यावर आंधार पडतो व त्या आंधाराचा फायदा घेवून महिलांच्या गळयातील मंगळसूत्र/साखळी चोरीच्या घटना वाढत आहेत. यासाठी रात्रीचे वेळी सन्मा.नगरसदस्यांसमवेत पाहणी करुन रस्त्यावरील उजेडास अडथळा करणाऱ्यां फांद्यांची छाटणी करणेस मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.सभापतींनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे)
सभापती
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-४४
अक्षेका /११/कावि/ २८१ /२०१४
दिनांक : ०४ / १० /२०१४

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती